# देगलूर महाविद्यालयात करिअर कट्टा

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधीची माहिती व्हावी यासाठी जागर करिअर कट्टा या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ.संतोष शेंबाळे यांनी माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. या वेळी डॉ. अनिल चिद्रावार, एल. एच. सुदाम, डॉ. आर.बी. लक्षटे, डॉ. काशिदे, प्रा. पाईकराव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.